मीडियावार्ता दि. ११/०६/२०२३

# दरोड्याच्या गुन्ह्यात टिफ देणारा आरोपी अटक

नांदेड/प्रतिनिधी-मुखेड हद्दीत चांडोळा येथून भगणूरकडे जात असलेल्या व्यक्तीस दोन मोटार सायकलवर पाच इसमांनी येवून त्यांना कट मारुन मोटार सायकल खाली पाडून चाकूचा धाक दाखवून नगदी २ लाख २५ हजार रुपयाची बॅग व एक सॅमसंग कंपनीचा बायोमॅट्रीक टॅब असा एकूण २ लाख ४५ हजार ५०० रुपयाचा मुदेमाल जबरीने चोरुन नेला होता. या प्रकरणात दरोड्याची टीप देणाऱ्यास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ७ जून रोजी जेरबंद केले.

याप्रकरणात पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी चोरट्याचा शोध घेण्याचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेला दिले होते. त्यानुसार पोनि द्वारकादास चिखलीकर यांनी पथक स्थापन केले. यामध्ये यापुर्वी सदर गुन्ह्याची उकल करुन एका आरोपीस अटक करण्यात आलेली होती. सदर गुन्ह्यातील इतर आरोपींना अटक करण्यासाठी स्थागुशाचे पोउपनि दत्तात्रय काळे व त्यांचे पथक आरोपींचा व मुद्देमालाचा शोध घेत असताना ७ जून रोजी मुखेड हद्दीत असताना त्यांना मुखेड गुरनं.१७१/२०२३ कलम ३९४, ३४ भादंवी मधील आरोपींना सदर माहिती देवून मदत करणारा इसम कपील गायकवाड, रा.चांडोळा हा खंडगांव फाटा ता. मुखेड येथे थांबला असल्याची माहिती मिळाली. या माहितीवरुन कपील गायकवाड यास ताब्यात घेवून विचारपूस केली असता आरोपी व त्याच्या मित्रांनी फायनान्सचे पैसे लुटण्याचा प्लॅन केला होता. व फिर्यादीचे लोकेशन त्याच्या आरोपी मित्रांना सतत देत होता. त्याने व त्याचे इतर पाच मित्रांनी मिळून सदरचा गुन्हा केल्याचे कबुल केले आहे. नमूद आरोपीस पुढील तपासकामी मुखेड पोलिसांच्या स्वाधीन केले आहे. या पथकात बालाजी तेलंग, विलास कदम, गणेश धुमाळ, पोहेकॉ अर्जुन शिंदे, राजेंद्र सिटीकर, दिपक ओढणे यांचा समावेश होता.